# मराठी भाषा आणि साहित्य विभाग

## वार्षिक अहवाल २०१८-१९

इस्माईल युसूफ महाविद्यालयातील मराठी विभाग आणि मराठी वाङ्मय मंडळातर्फे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ ह्या वर्षात अनेक अभ्यासपूरक उपक्रम राबविण्यात आले. मराठी वाङ्मय मंडळ दरवर्षी विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रम, स्पर्धा आणि उपक्रमांचे आयोजन करीत असते. मराठी वाङ्मय मंडळातर्फे , दिनांक १५/०२/२०१९ ते २०/०२/२०१९ ह्या कालावधीत 'मराठी भाषा संवर्धन सप्ताह' तसेच दिनांक २७ फेब्रुवारी २०१९ रोजी 'मराठी भाषा गौरव दिन ' साजरा करण्यात आला.

- **निबंध स्पर्धा :**

मराठी भाषा संवर्धन सप्ताहानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन शुक्रवार,१५/०२/२०१९ रोजी सकाळी १०.३० वाजता करण्यात आले होते. प्रस्तुत निबंधस्पर्धेत मराठी भाषेसंदर्भातील विविध विषयांवरील निबंध विद्यार्थ्यांनी लिहिले . ह्या निबंधस्पर्धेत एकूण १६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला .

- **मराठी शुद्धलेखन स्पर्धा :**

मराठी भाषा संवर्धन सप्ताहानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी मराठी शुद्धलेखन स्पर्धेचे आयोजन शुक्रवार, दिनांक १५/०२/२०१९ रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आले होते. ह्या उपक्रमात एकूण १३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला .

- **ग्रंथ परीक्षण स्पर्धा :**

मराठी भाषा संवर्धन सप्ताहानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी ग्रंथ परीक्षण स्पर्धेचे आयोजन शनिवार,दिनांक १६/०२/२०१९ रोजी सकाळी १०.३० वाजता करण्यात आले होते. ह्या उपक्रमात एकूण १२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला .

- **काव्य रसग्रहण स्पर्धा :**

मराठी भाषा संवर्धन सप्ताहानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी काव्य रसग्रहण स्पर्धेचे आयोजन शनिवार,दिनांक १६/०२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता करण्यात आले होते. ह्या उपक्रमात एकूण १२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला .

- **सर्जनशील लेखन स्पर्धा :**

मराठी भाषा संवर्धन सप्ताहानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी सर्जनशील लेखन स्पर्धेचे आयोजन शनिवार,दिनांक १६/०२/२०१९ रोजी सकाळी ११.३० वाजता करण्यात आले होते. ह्या उपक्रमात एकूण ११ विद्यार्थ्यांनी स्वरचित कविता आणि कथा लिहून सहभाग नोंदवला.

- **काव्यवाचन** :

मराठी भाषा संवर्धन सप्ताहानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी काव्यवाचन उपक्रमाचे आयोजन सोमवार ,दिनांक १८/०२/२०१९ रोजी दुपारी १२.०० भाषाभवन येथे करण्यात आले होते. प्रस्तुत काव्यवाचन उपक्रमात मराठी भाषेतील विविध विषयांवरील कविता विद्यार्थ्यांनी सादर केल्या. ह्या काव्यवाचन उपक्रमात एकूण ११ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

- **मराठी भाषा गौरव दिन :**

मराठी विभागातर्फे बुधवार,दिनांक २७ फेब्रुवारी २०१९ रोजी कवी कुसुमाग्रज जयंतीनिमित्त मराठी भाषा गौरव दिनाचे आयोजन करण्यात आले होते . ह्या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून अधिवक्ता श्री. वसंत साळवी (अध्यक्ष , राजभाषा मराठी संरक्षण आणि संवर्धन मंच ;लेखक ,कवी व वक्ते) ह्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. माधुरी जोशी(हिंदी विभागप्रमुख) ह्यांनी भूषविले. याप्रसंगी मराठी भाषा संवर्धन आणि कवी कुसुमाग्रज ह्यांच्याबद्दल मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित

करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथींच्या हस्ते मराठी भाषा संवर्धन सप्ताहानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांतील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण  करण्यात आले. ह्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. समीर वैरागी ह्यांनी केले,तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन  डॉ. एकनाथ फुटाणे ह्यांनी केले.  कार्यक्रमाचा  शेवट 'मराठी अभिमानगीता'च्या सामूहिक गायनाने झाला. ह्या कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी ह्यांची आवर्जून उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. स्वाती वाव्हळ ह्यांचे मार्गदर्शन लाभले.

राकेश मोरे,हना बेग, सय्यद गौस,ओमकेश लहांगे,ओमकार नलावडे,निलेश खताते,तुषार जाधव,रोहन खंदारे, गितेश भोसले, काजल म्हसकर, अनिकेत ताजणे, सायली यादव ,प्रज्ञा जांभळे , नेहा कदम, श्रुती दिवटे आदी विद्यार्थ्यांचा वाङ्मय मंडळाच्या कार्यक्रमात उत्तम सहभाग राहिला.

**प्रा. समीर रामचंद्र वैरागी**
**मराठी विभागप्रमुख.**

- **‘मराठी भाषा संवर्धन सप्ताह ’ अंतर्गत आयोजित केलेल्या विविध स्पर्धांचे निकाल**

**१.मराठी निबंध स्पर्धा**

- निलेश खताते – द्वितीय वर्ष कला

**२.मराठी शुध्दलेखन स्पर्धा**

- शिवराज रायगोंडे – प्रथम वर्ष कला

**३.ग्रंथपरीक्षण स्पर्धा**

- वैभव गवई – द्वितीय वर्ष कला

**४.कविता रसग्रहण स्पर्धा**

- शिवराज रायगोंडे – प्रथम वर्ष कला

**५.सर्जनशील लेखन स्पर्धा**

- राकेश मोरे – द्वितीय वर्ष कला

**६.काव्यवाचन स्पर्धा**

- सायली यादव - द्वितीय वर्ष कला

- **तृतीय वर्ष कला (मराठी) विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी (शैक्षणिक वर्ष २०१७-१८)**

- **प्रथम क्रमांक –** सारिका जगताप
- **द्वितीय क्रमांक –** ऐश्वर्या बारे
- **तृतीय क्रमांक** - रोहिणी डफळे

**प्रा. समीर रामचंद्र वैरागी**
**मराठी विभागप्रमुख.**